# कृषि उत्पन्न बाजार समिती,बार्शी . ४१३४०१

फोन-02184-222976

Email ID-am_barshi@msamb.com

जा.क्र. कृ.बा/परिपत्रक/११२ दि. 31 MAY 2025

## परिपत्रक

**प्रति,**
**सर्व गोपालक शेतकरी / जनावर व्यापारी/ वाहतुकदार,**
**बार्शी / वैराग.**

**विषय :- बकरी ईद सन २०२५ राज्यात साजरा करतांना महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ व महाराष्ट्र प्राणी रक्षण अधिनियम १९९५ (सुधारणा ४ मार्च २०१५) ची अमंलबजावणी करणेबाबत...**

**संदर्भ:- मा. अध्यक्ष महाराष्ट्र गोसेवा आयोग, पुणे-६७ यांचे जा.क्र. मगोसेआ/प्र.क्र.४६/८९६/२०२५-२६ औंध, पुणे-६७ दि. २७/०५/२०२५ रोजीचे पत्र.**

सर्व गोपालक शेतकरी, जनावर व्यापारी व वाहतुकदार यांना कळविणेत येते, उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सन २०२५-२६ या वर्षात ०७-०६-२०२५ रोजी बकरी ईद हा सण राज्यात साजरा होणार आहे. या सणासाठी मोठ्या प्रमाणावर जनावरांची कत्तल/कुर्बानी करण्यात येते. महाराष्ट्र प्राणी रक्षण अधिनियम १९९५ सुधारणा दि.०४/०३/२०१५ पासुन राज्यात संपुर्ण गोवंध हत्याबंदी कायदा लागु करण्यात आला आहे. सदर सुधारित अधिनियमाप्रमाणे गोवंशाची कत्तल करण्यास मनाई आहे. तसेच या अधिनियमातील कलम ५ अ अन्वये गोवंशाची कत्तल, कत्तलीसाठी वाहतुक, कत्तलीसाठी निर्यात, कत्तलीसाठी खरेदी-विक्री, कत्तलीकरिता विल्हेवाट, गोवंशाचे मांस ताब्यात ठेवण्यास व राज्याबांहेर कत्तल केलेल्या गोवंशाचे मांस ताब्यात ठेवण्यास सक्त मनाई आहे.

तरी या परिपत्रकान्वये सर्व गोपालक शेतकरी, जनावर व्यापारी व वाहतुकदार यांना कळविणेत येते, कृषि उत्पन्न बाजार समिती बार्शी उपबाजार आवार वैराग येथे दि.०४/०६/२०२५ व कृषि उत्पन्न बाजार समिती बार्शी मुख्य बाजार आवार येथे दि. ०७/०६/२०२५ रोजी जनावर बाजारामध्ये गोवंशाचा बाजार भरणार नाही, याची नोंद घ्यावी.

सचिव
कृषि उत्पन्न बाजार समिती,बार्शी

Scanned with OKEN Scanner